Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २२ ] गुरुवार ते बुधवार, मे २८-जून ३, २०२६/ज्येष्ठ ७-१३, शके १९४८ [पृष्ठे १४, किंमत : रुपये ३०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क, यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-१४ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-३ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५०.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, अन्वये कलम १९ (१) खालील अधिसूचना**

क्रमांक-स. म. अ.-शिरस्तेदार–भूसंपादन-कावि-७६०-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक ६५८, दिनांक २४ जुलै, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आलेली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, वर्धा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून,उक्त अधिनियमाच्या कलम १९ पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची- तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची- चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी श्री. आकाश अवतारे, उपविभागीय अधिकारी तथा सक्षम भूसंपादन अधिकारी, हिंगणघाट यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक :- २९- एलएक्यु-४७-२०२४-२५, मौजा- भोसा, तालुका- समुद्रपुर, जिल्हा - वर्धा.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३६ | ० ०७ |
| २ | ३७ | ० ३६ |
| ३ | ३८ | ० २४ |
| ४ | ३९ | ३ ६० |
| ५ | ४१/१ | ० ८३ |
| ६ | ४१/१ | १ ०१ |
| ७ | ४१/२ | १ ०१ |
| ८ | ४७ | १ ५० |
| ९ | ५० | १ ९३ |
| १० | ७४ | ० ९१ |
| ११ | ७५ | १ ५२ |
| १२ | ७६ | १ १६ |
| १३ | ८२ | ० ५० |
| १४ | ८५/२ | १ १० |
| १५ | ८६ | ० ३१ |
| १६ | ९८/१ | ० ४० |
| १७ | १०२ | १ ७० |
| १८ | १०६ | ० १० |
| १९ | ११२/१ | २ ०५ |
| २० | ११६ | ० २८ |
| २१ | १९७/१, १९७/२ पैकी | २ ९४ |
| २२ | २०३ | ० ७४ |
| २३ | २०५ | ० ०५ |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | २४ ३१ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :- | पावरग्रिड वेस्ट सेंट्रल ट्रांसमिशन लिमिटेड. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :- | ६००० MW + ८०० k V Nagpur HVDC Terminal याचे बांधकाम करण्याकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) | :- | राज्याच्या भविष्यातील विजेची मागणी पूर्ण करण्यात मदत होईल. प्रकल्पाव्दारे गैरजीवाश्म ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा प्राप्त करून पर्यावरणाचा समतोल साधणे शक्य होणार आहे. तसेच विजेच्या उपलब्धतेमुळे औद्योगिक विकास व रोजगार निर्मितीस चालना मिळून सामाजिक कल्याण साधण्यास मदत होणार आहे. |

**अनुसूची-तीन**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

कुणीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही.

**अनुसूची-चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला). भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) अन्वये महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक ३० जून, २०२५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

-निरंक-

**टीप** :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, हिंगणघाट या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५१.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, अन्वये कलम १९ (१) खालील अधिसूचना**

क्रमांक स. म. अ.-शिरस्तेदार–भूसंपादन-कावि-७६१-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक ६५८, दिनांक २४ जुलै, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आलेली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, वर्धा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून,उक्त अधिनियमाच्या कलम १९ पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची- तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी

"पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची- चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी श्री. आकाश अवतारे, उपविभागीय अधिकारी तथा सक्षम भूसंपादन अधिकारी, हिंगणघाट यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक :- ३० - एलएक्यु-४७-२०२४-२५, मौजा- वायगांव (बै), तालुका- समुद्रपुर, जिल्हा - वर्धा.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | २०२/१ | ० ५२ |
| २ | २०३/१ | ० ५३ |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | १ ०५ |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :- | पावरग्रिड वेस्ट सेंट्रल ट्रांसमिशन लिमिटेड. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :- | ६००० MW + ८०० k V Nagpur HVDC Terminal याचे बांधकाम करण्याकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) | :- | राज्याच्या भविष्यातील विजेची मागणी पूर्ण करण्यात मदत होईल. प्रकल्पाव्दारे गैरजीवाश्म ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा प्राप्त करून पर्यावरणाचा समतोल साधणे शक्य होणार आहे. तसेच विजेच्या उपलब्धतेमुळे औद्योगिक विकास व रोजगार निर्मितीस चालना मिळून सामाजिक कल्याण साधण्यास मदत होणार आहे. |

**अनुसूची-तीन**

**बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

कुणीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही.

**अनुसूची-चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला): भूमि संपादन, पनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) अन्वये महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक ३० जून, २०२५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

-निरंक-

**टीप** :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, हिंगणघाट या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

वर्धा :
दिनांक ५ मे, २०२६.

**वान्मथी सी.,**
जिल्हाधिकारी, वर्धा.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५२.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, अंतर्गत कलम १९ (१) खालील अधिसूचना**

क्रमांक अका-भूसंपादन-सामान्य-२-कावि-५१-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक २९४, दिनांक २६ डिसेंबर, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, भंडारा जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे ;

आणि म्हणून,उक्त अधिनियमाच्या कलम १९ पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची- तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची- चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सामान्य - २, भंडारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाचे जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१- एलक्युएन-२०२५-२६, मौजा- विहीरगांव (क), तालुका- लाखनी, जिल्हा - भंडारा.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | भूधारणा प्रकार | संपादित क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | हे. आर |
| १ | २०६ | वर्ग १ | ० ०६७ |
| २ | २५३/१ | वर्ग १ | ० ११० |
| ३ | २५५ | वर्ग १ | ० १२५ |
| | | एकूण संपादित क्षेत्र . . | ० ३०२ |

**कामाचे नाव :-** नेरला उपसा सिंचन योजनेच्या मुख्य कालव्यावरील पुच्छ शाखा कालव्याचा पुच्छ कालव्याच्या बांधकामाकरीता.

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :- गोसीखुर्द प्रकल्प. |
| प्रकल्पाचे वर्णन | :- नेरला उपसा सिंचन योजनेच्या मुख्य कालव्यावरील पुच्छ शाखा कालव्याचा पुच्छ कालव्याच्या बांधकामाकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ | :- २८६८० हे. आर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारना बरोबरच रोजगारात ही वाढ होणे अपेक्षित आहे. |

**अनुसूची-तीन**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापित होत नाही.

**अनुसूची-चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या प्राधिकरणाने दिलेला). भूमि संपादन, पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६ (२) अन्वये अनुषंगाने प्रकल्पाचे पर्यावरणीय प्रभाव निर्धारण झाले असल्याकारणाने एस. आय. ए. (सामाजिक प्रभाव निर्धारण) लागू नाही.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासनाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम :- -निरंक-

आ. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :- -निरंक-

क. ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापूर्वी भरावे). :- -निरंक-

**टीप** :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सामान्य - २, भंडारा यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

दिनांक ७ मे, २०२६.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५३.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, अन्वये कलम १९ (१) ची अधिसूचना**

क्रमांक म.स.-प्रस्तु ३-भूसंपादन-कावि-५९६-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक १४३८, दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, भंडारा जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे ;

आणि म्हणून,उक्त अधिनियमाच्या कलम १९ पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची- तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची- चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, साकोली यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाचे जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १८- एलक्युएन-२०२४-२५, मौजा- लाखनी, तालुका- लाखनी, जिल्हा - भंडारा.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ७५६/२ | ०.०५.४० |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | ०.०५.४० |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :- नगर पंचायत, लाखनी अंतर्गत रस्त्याचे बांधकाम.

प्रकल्पाचे वर्णन :- नगर पंचायत लाखनीचे कार्यक्षेत्रातील मौजा- लाखनी येथील प्रभाग क्र. १२ मधील सर्व्हे नं. ७५६ एकूण आराजी २.९३ हे. आर मधील श्री. अरविंद जयकृष्ण खेडीकर यांचे मालकीचे जागेतून प्रस्तावित ९.०० मी. रुंद व ६०.०० मी. लांबीच्या घोषीत सार्वजनिक रस्त्याचे बांधकामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ :- नगर पंचायत, लाखनीचे कार्यक्षेत्रातील मौजा- लाखनी येथील प्रभाग क्र. १२ मधील सर्व्हे नं. ७५६ एकूण आराजी २.९३ हे. आर मधील श्री. अरविंद जयकृष्ण खेडीकर यांचे मालकीचे जागेतून प्रस्तावित ९.०० मी. रुंद व ६०.०० मी. लांबीच्या घोषीत सार्वजनिक रस्त्यामुळे लोकाना वाहतुकीस व रहदारीस सोयीस्कर होईल.

## अनुसूची-तीन

## बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

सदर भूसंपादित जमिनीमुळे बाधीत व्यक्ती विस्थापित होत नसल्यामुळे विस्थापन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

- निरंक -

**टीप** :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे अभिलेख उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, साकोली यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

भंडारा :
दिनांक १२ मे, २०२६.

**सावन कुमार,**
जिल्हाधिकारी, भंडारा.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५४.

**उपविभागीय अधिकारी, यांजकडून**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ सह महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (४) प्रमाणे कलम १९ खालील अधिसूचना**

क्रमांक अ.का.-भू.सं.-उविअ-नाग.-श.-कावि-६८-२०२६.—

**प्रकल्पाचे नाव :-** भूसंपादन प्रकरण क्रमांक ५-अ-६५-२०२५-२०२६, मौजा सिताबर्डी, तह. नागपूर (शहर), जि. नागपूर येथील रेल्वे स्टेशन जवळील शिट क्र. ६४, नगर भूमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकूण ७५०३.२० चौ. मी. क्षेत्राची जागा २५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरण व तदनुषंगीक मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेचा विकास करणेकरिता जागा संपादन करणेसाठी आयुक्त तथा प्रशासक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०२५ रोजी मूळ प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना सादर केलेला आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ अन्वये या कार्यालयास प्राप्त अन्वये या कार्यालयास भूसंपादनाची कार्यवाही पार पाडणेसाठी प्राधिकृत करुन वर्ग करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर भूसंपादन प्रकरण नोंदवून कार्यवाही सुरु करण्यात आली.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नागपूर शहराची सुधारित विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र. क्र. ३००(अ)-९७-नवी-९, दिनांक ७ जानेवारी, २००० अन्वये भागशः मंजूर झालेली असून ती दिनांक १ मार्च, २००० पासून अंमलात आलेली आहे व पुनर्प्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र. क्र. २००-२०००- नवि-९, दिनांक १० सप्टेंबर, २००१ रोजी मंजूर केलेली असून उक्त विकास योजना दिनांक २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४०१-८८५- प्र. क्र. ७६ /नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००२ सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषीत केलेले होते. तथापी, शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र. क्र. १५४-नवि-९, दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील ७ योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र. क्र. १५४ (भाग-१)-२०१९-नवि-९, दिनांक ९ एप्रिल, २०२१ नुसार स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील भाग वगळता ७ योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केले होते. सदर जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-२२२४-१३७७ प्र. क्र. १४७-२०२२-नवि-९, मंत्रालय, मुंबई ३२. दिनांक १५ मार्च, २०२४ अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली असून त्यात खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

१) मौजा सिताबर्डी रेल्वेस्टेशन जवळील रामझुला (जयस्तंभ चौक) ते किग्जवे हॉस्पीटल पर्यंत विकास योजनेतील २४.०० मी. रुंदीचा रस्ता ३१.०० मी. रुंदीचा रस्ता करणे, तसेच जयस्तंभ चौक ते मानस चोकापर्यंत २४.०० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता २५,०० मी. रुंदीचा रस्ता करणे तसेच Extension To Railway C-३० (भागशः) Extension to MSRTC-MC-१२. Extension to MPSRTC-MC-११ ही आरक्षणे वगळुन उक्त जागेवर विकास योजनेत २५.०० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करणेबाबत,

२) MSRTC च MPSRTC या करीता नामनिर्देशित असलेली जागा तसेच नेहरु मॉडेल हायस्कूल या सार्वजनिक / निमसार्वजनिक वापरामध्ये समाविष्ट असलेल्या दोन्ही जागांचा विद्यमान वापर बदलवून वाणिज्य वापरामध्ये समाविष्ट करणेबाबत.

३) मौजा सिताबर्डी व मौजा नागपूर मधील लोहापुलाला लागून असलेल्या जागेत भूमीगत रस्ता (RUB) प्रस्तावित करणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत.

तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-२४२५-५५२-प्र. क्र. ७८-२०२५-नवि-१, मंत्रालय, मुंबई ३२. दिनांक २८ जुलै, २०२५ अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली असून त्यात सुधारित विकास योजना-नागपूर मौजे सिताबर्डी येथील नगर भूमापन क्र. २४२२, २४०८, २३१०, २४०९, २४०७, २४०६, २४०४, २४०३ व २४०२ मधील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) व मध्य प्रदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MPSRTC) याकरिता नामनिर्देशित असलेल्या जागेचा विद्यमान वापर वगळून तसेच नेहरु मॉडेल हायस्कुलची जागा सार्वजनिक / निमसार्वजनिक विभागातून वगळून, मुक्त झालेले क्षेत्र 'मल्टी मॉडल ट्रान्सपोर्ट हब म्हणून दर्शविणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(२) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत नमूद केलेले आहे.

तसेच उक्त मंजूर विकास योजनेत विषयांकित भुसंपादन प्रकरण क्रमांक ५-अ-६५-२०२५-२०२६, मौजा-सिताबर्डी, तह. नागपूर (शहर), जि. नागपूर येथील रेल्वे स्टेशन जवळील शिट क्र. ६४, नगर भूमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकूण ७५०३.२० चौ. मी. जागा २५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरण व तद्नुषंगीक मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता खाजगी जागेचे नागपूर महानगरपालिकेस करावयाचे असून, त्याअनुषंगाने भूसंपादनाचा प्रस्ताव सर्व कागदपत्रासह आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे असे सदर प्रस्तावात नमूद आहे.

वरीलपैकी ७५०३.०० चौ. मी. या खाजगी जागेचे सर्वेखनानुसार नगर भूमापन अधिकारी यांचेमार्फत मोजणी मामला क्र. १९, दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये रितसर संयुक्त मोजणी करण्यात आली आहे. दिनांक २७ सप्टेंबर, २०१९ च्या संयुक्त मोजणी अहवालामध्ये नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, यांनी सदर जागेचे क्षेत्र मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता बाधीत होत आहेत असे नमूद केले आहे. मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता शिट क्र. ६४, नगर भूमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकूण ७५०३.०० चौ. मी. सदरहू खाजगी जागा महानगरपालिकेला संपादीत करावयाच्या असून उपरोक्त खाजगी मालमत्तांच्या जागेच्या मुळ मालकीनुसार विहीत नमुन्यात नमूद करून भूसंपादन प्रस्ताव प्रपत्रासह सादर करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त खाजगी मालमत्ता शिट क्र. ६४, नगर भुमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकूण क्षेत्र ७५०३.०० चौ.मी. जागा २५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरणं व तदनुषंगीक मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता महानगरपालिकेस आवश्यक असल्यामुळे सदर खाजगी जागा महानगरपालिकेस भूसंपादन करण्याकरीता नगर भूमापन विभागाचे संयुक्त मोजणी मामला क्र. १९, दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये नकाशा "क" प्रतीनुसार एकूण संपादनाखालील क्षेत्र ७५०३.०० चौ. मी. असून सदर्हु क्षेत्राचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

उपरोक्तप्रमाणे भूसंपादन प्रकरण क्रमांक ५-अ-६५-२०२५-२०२६, मौजा-सिताबर्डी, तह. नागपूर (शहर), जि. नागपूर येथील रेल्वे स्टेशन जवळील शिट क्र. ६४, नगर भूमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकूण क्षेत्र ७५०३.०० चौ. मी. जागा २५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरण व तदनुषंगीक मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता खाजगी जमीन संपादन करणेकरीता खाजगी मिळकतीमधील जागा महानगरपालिकेस आवश्यक असल्याने सदर जागेकरीता भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार खाजगी जागा भूसंपादनाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ अंतर्गत सदर प्रस्ताव आवश्यक त्या पुढील कार्यवाहीस्तव या कार्यालयात सादर केलेला आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६(२) व १२६(४) अन्वये शासनाकडील निर्णय क्र. टिपीबी-४३१४-१८१-प्र. क्र. ९-२०१५-नवि-११, दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ अन्वये प्रदत्त अधिकारान्वये भूमी संपादन, पूनवर्सन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १९ प्रमाणे भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

## अनुसूची - एक
## जमिनीचे वर्णन

भुसंपादन प्रकरण क्रमांक ५-अ-६५-२०२५-२०२६, मौजा-सिताबर्डी, तह. नागपूर (शहर), जि. नागपूर येथील रेल्वे स्टेशन जवळील शिट क्रं. ६४, नगर भूमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकूण क्षेत्र ७५०३.०० चौ. मी. जागा २५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरण व तदनुषंगीक मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता खाजगी जमीन संपादनाचा तपशील खालीलप्रमाणे.

मौजा- सिताबर्डी, तालुका : नागपूर, जिल्हा : नागपूर

| अ. क्र. | मोक्यावरील भूमि धारकाचे नाव | शिट क्रमांक | नगर भूमापन क्रमांक | आखिवपत्रिकाप्रमाणे भूधारकाचे नाव | मालमत्ता पत्रिकेनुसार क्षेत्र | संयुक्त मोजणी प्रमाणे संपादीत करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) (चौ. मी.) | (७) (चौ. मी.) |
| १ | महाराष्ट्र स्टेट मोटर स्टँड कार्पोरेशन | ६४ | २४०३ | महाराष्ट्र सरकार | ४७६३.०० | ४७६३.०० |

**अनुसूची - एक**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) (चौ. मी.) | (७) (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | मध्यप्रदेश स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कार्पोरेरशन | ६४ | २४०४ | महाराष्ट्र सरकार | २७४०.२० | २७४०.२० |
| | | | | एकूण . . | ७५०३.२० | ७५०३.२० |

एकूण संपादन क्षेत्र अदमासे ७५०३.०० चौ.मी

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांव :-** भूसंपादन प्रकरण क्रमांक ५-अ-६५ -२०२५-२०२६ मौजा-सिताबर्डी, तह. नागपूर (शहर), जि. नागपूर येथील रेल्वे स्टेशन जवळील शिट क्र. ६४, नगर भुमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकूण क्षेत्र ७५०३.२० चौ. मी. जागा २५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरण व तद्नुषंगीक मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता खाजगी जमीन संपादन करणेबाबत.

**प्रकल्पकार्याचे वर्णन :-** मौजा-सिताबर्डी, भूसंपादन प्रकरण क्रमांक ५-अ-६५-२०२५-२०२६ येथील रेल्वे स्टेशन जवळील शिट क्र. ६४, नगर भूमापन क्रमांक २४०३ व २४०४ मधील अनुक्रमे ४७६३.०० चौ. मी. व २७४०.२० चौ. मी. असे एकुण क्षेत्र ७५०३.०० चौ. मी. जागा २५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरण व तद्नुषंगीक मल्टीमॉडेल ट्रॉन्सपोर्ट हब या सुविधेकरिता खाजगी जमीन संपादनाचा.

**समाजाला मिळणारे लाभ :-** सदर जागा नागपूरच्या मध्यवर्ती ठिकाणी असून मध्यवर्ती रेल्वे स्थानकालगत आहे. मध्यवर्ती रेल्वे स्थानकावर प्रवाशांची संख्या व वर्दळ आणि सद्यःस्थितीत रेल्वे स्थानकाचा होणारा विकास आणि भविष्यात पुरविण्यात येणाऱ्या सोई सुविधा धार्मिक स्थळी होणारे भाविकांचे आवागमन त्यासाठी आवश्यक दळणवळणाच्या पायाभूत सोईसुविधा उभारणी निर्माण आणि समाजाला होणारे व्यापक व सर्वसमावेशक लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध होवून वाहनांची कोंडी, दळणवळणाचा प्रश्न, प्रदुषण दुर करणे, एकत्रित व सर्वसमावेशक, दळणवळण यंत्रणा यांचा समन्वय होवून नागरिकांचे जीवन सुखकर होणे.

सदर प्रकरणात शिट क्र. ६४ नगर भूमापन क्र. २४०४ या जमिनीचे भूधारक मध्य प्रदेश स्टेट रोड टॉन्सपोर्ट कॉपोरेशन, नागपूर यांनी महाराष्ट्र शासन यांचेविरुध्द रिट पीटीशन याचिका क्र. ६०९/२०१९ दाखल केलेली आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २४ जानेवारी, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

Issue notice to the respomdamts for final disposal of the matter returnable on 22 March, 2019.

The learned Additional Government Pleader waives service of notice to the respondent Nos. 1 to 3 and Shri. Aurangabadkar, the learned A.S.G.I waives service of notice to the Respondent No. 4.

In the meantime, the parties are directed to maintain status-quo in respect of the possession of the property.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट पीटीशन क्र. २७५६/२०२२ व ५६३३/२०२२ मध्ये दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

1. List on 20 February], 2025 by which time Mr.Chavan, learned Government Pleader shall make a statement regarding the reconsideration of the rejection of the proposal for modification of the user of the land which is occupied by MPSRTC and MSRTC and the time frame for that.

2. The Municipal Commissioner and Mr. Shrikant Andge, Deputy Secretary, Urban Development Department are present in Court in pursuance to the earlier order. The presence of these Officers for the next date is dispensed with as of now.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट पीटीशन क्रं. २७५६ / २०२२ व ५६३३/२०२२ मध्ये दिनांक ३१ जूलै,२०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

After hearing some time, learned counsels appearing on behalf of respective parties collectively stated that to decide the controversy involved in the matter, Urban Development Department II through Principal Secretary is necessary party in the matter to resolve the controversy.

2. Accordingly, the permission is granted to the petitioner to implead Urban Development Department-II through Principal Secretary in the array of the respondents.

3. Necessary amendment be carried out forthwith.

4. Shri P.P.Pendke, learned Assistant Government Pleader waives service of notice on behalf of newly added respondent.

5. It is further directed to learned Assistant Government Pleader to place on record necessary affidavit in terms of direction issued by this Court vide order dated 13th December, २०२३.

6. Furthermore, considering the order dated 23 August 2023, wherein it is stated that proposal for acquisition pending bef the Collector, accordingly, affidavit also be filed on record about the status of acquisition proposal on or before next date

७. List the matter for further consideration on २१th August, २०२५.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट पीटीशन क्र. २७५६/२०२२ व ५६३३/२०२२ मध्ये दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

1. The learned Government Pleader Mr. D. V. Chauhan placed on record a Communication dated 21st August, 2025 by which, it is informed by the Section Officer, Maharashtra State that for acquisition of land in Sitabuldi, Nagpur, a proposal of amount of Rs. ३१.३३ Crores was placed before the State Level Project Sanction Committee and the Committee has recommended for grant of said amount which was demanded under NAGAROTTHAN Scheme to UD-II. The Communication, so placed on record is marked as "X" for identification.

2. All the Respondents including Metro Rail Corporation Ltd. to process acquisition further as early as possible.

3. 3. List the matter on 25th November, 2025 for further consideration.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक**

- निरंक -

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

- निरंक -

**टीप :-** उक्त जमिनीच्या नकाशाचे नगर रचना विभाग, म.न.पा., नागपूर यांचे कार्यालयात निरिक्षण करता येईल.

**सुरेश बगळे,**
उपविभागीय अधिकारी,
नागपूर शहर.

नागपूर शहर :
दिनांक २० मे, २०२६.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५५.

**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम २१(१) (४) अंतर्गत**

**जाहीर नोटीस**

क्रमांक-कावि-अका-भूसं/उविअ-प्र-२-५३०-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन म्हणजे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,राजुरा यांचे कार्यालयात भूसंपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्यांचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये प्रकल्पाच्या धरणाच्या सांडव्याकरीता लागणारी जमीन संपादनाचे प्रकरणात अधिनियमाचे कलम १९ अधिसुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेली जमीन प्रकल्पाच्या धरणाच्या सांडव्याकरीता आवश्यक असल्याने सदर जमीनीबाबत मोबदला / पुनर्वसन या बाबत असलेल्या हितसंबंधा बाबत म्हणने उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, राजुरा यांचे समोर दाखल करणे आवश्यक आहे;

सबब, सर्व संबंधीत जमीनधारकांना कळविण्यात येते की, त्यांनी स्वतः त्यांचे प्रतिनिधी / त्यांचे वकील मार्फत त्यांचे म्हणने त्यांना दिलेल्या वैयक्तीक नोटीसमध्ये नमूद केलेल्या दिनांकाला उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचे कार्यालयास त्यांचे समक्ष सादर करावे.

त्यांना असेही कळविण्यात येते की, संपादनाखालील जमिनीसोबत आपला असलेला त्यांचा हितसंबंध व मोबदला रक्कम तसेच हितसंबंधाच्या अनुषंगाने मोबदला मिळण्याबाबत त्यांचा असलेल्या मागणीचा तपशिल व पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्याबाबत त्यांची असलेली मागणी तसेच संयुक्त मोजणीबाबत त्यांचा असलेला काही आक्षेप त्या वेळी आपणास सादर करता येईल.

त्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे म्हणणे स्वतः किंवा प्रतिनिधीच्या स्वाक्षरीसह लेखी स्वरुपात दाखल करावे.

**परिशिष्ट**

**जमिनीचे वर्णन**

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | सर्व्हे क्रमांक | ७/१२ प्रमाणे क्षेत्र | संयुक्त मोजणी अहवालाप्रमाणे संपादन खालील क्षेत्र व त्यातील संसाधने | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | क्षेत्र हे. आर | घर | विहीर बोरवेल | झाडे |
| (१) | (२) | (३) | (४) | | (५) | | |
| | | | | हे. आर | | | |
| १ | कमलाबाई बाबुराव मोरे, विजया राजेश बोढे, संगीता सुनिल निमकर, सविता महेश मत्ते, सतिश बाबुराव मोरे, किशोर बाबुराव मोरे | ११/१ | १ २२ | ० ०४ | -- | -- | -- |

**रविंद्र माने,**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, राजुरा.

राजुरा :
दिनांक ६ मे, २०२६.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५६.

**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, यांजकडून**

**वाचा :-** (१) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील अधिसुचना क्रमांक. एसव्हीसिआर.४३२३-स-४-९४, दिनांक- २२ नोव्हेंबर, १९९४.

(२) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८-प्र. क्र. १३-मातंक, मुंबई-४००००१, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः गाजप्र-२०११-प्र. क्र. १३६-पंरा-४, मुंबई- ४००००१. दिनांक २१ जानेवारी, २०२०.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-SOP-प्र. क्र. १४२-२०२०, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-प्र. क्र. ३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी,२०२१.

**संदर्भ :-**उप अधीक्षक भूमि अभिलेख, जिवती यांचेकडील क्रमांक गावठाण-परिरक्षण प्रस्ताव-मौजा कोदेपूर-२०२६, जिवती दिनांक ३० एप्रिल, २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक-स्वामित्व-अधिसूचना-मौजा-कोदेपूर-का.वि.३७५-२०२६.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील निर्णय क्रमांक १०९३-प्र. क्र. १९-ल-१, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील अधिसुचना क्रमांक एसव्हीसिआर.४३२३-स-४-१९९४, दिनांक २२ सप्टेंबर, १९९४ अन्वये नागपूर विभागातील साजांची पुनर्रचना करणेत आली असून साजांची गावे व मिळकत कायम करणेत आलेल्या आहेत.

स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा-कोदेपूर (५४१६६८), ता. जिवती. जि. चंद्रपूर या गावचे ड्रोनव्दारे गावठाण भूमापन करण्याचे काम सर्व्हे ऑफ इंडीयाकडून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच चौकशी काम पूर्ण होवून आखिव पत्रिका व सनदा तयार झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, जिवती यांचे अधिनस्त साजा-पुडीयाल मोहदा मध्ये मौजा-कोदेपूर (५४१६६८), ता. जिवती, जि. चंद्रपूर हे गाव नव्याने समाविष्ठ करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस याव्दारे मंजुरी देणेत येत आहे.

सदर अधिसुचनेची अंमलबजावणी दिनांक ८ मे, २०२६ पासून होणेची आहे. तसेच सदर गावाची सनद फी रक्कम रूपये ३०,०४०/- (अक्षरी रुपये तिस हजार चाळीस फक्त) ची त्वरीत वसूली करण्यात यावी.

दिनांक ८ मे, २०२६.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५७.

**वाचा :-** (१) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक. एसव्हीसिआर. ४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर, १९९४.

(२) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, मुंबई-४००००१, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः गाजप्र-२०१९-प्र.क्र.१३६-पंरा-४, मुंबई- ४००००१. दिनांक २१ जानेवारी, २०२०.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-SOP-प्र.क्र.१४२-२०२०, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

**संदर्भ :-** उप अधीक्षक भूमि अभिलेख, जिवती यांचेकडील क्र. गावठाण-परिरक्षण प्रस्ताव-मौजा टेकामांडावा-२०२६ जिवती दिनांक ८ मे, २०२६.

## अधिसूचना

क्रमांक स्वामित्व-अधिसुचना-मौजा-टेकामांडवा-का.वि.३९६-२०२६.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील निर्णय क्रमांक. १०९३-प्र. क्र. १९- ल-१, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक. एसव्हीसिआर.४३२३-स-४-१९९४, दिनांक २२ सप्टेंबर, १९९४ अन्वये नागपूर विभागातील साजांची पुनर्रचना करण्यात आली असून साजांची गावे व मिळकत कायम करणेत आलेल्या आहेत.

स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा- टेकामांडवा (५४१७०१), ता. जिवती, जि. चंद्रपूर या गावचे ड्रोनव्दारे गावठाण भूमापन करण्याचे काम सर्व्हे ऑफ इंडीयाकडून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच चौकशी काम पूर्ण होवून आखिव पत्रिका व सनदा तयार झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, जिवती यांचे अधिनस्त साजा-पुडीयाल मोहदा मध्ये मौजा-टेकामांडवा (५४१७०१) ता. जिवती, जि. चंद्रपूर हे गाव नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस याव्दारे मंजुरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक १४ मे, २०२६ पासून होणेची आहे. तसेच सदर गावाची सनद फी रक्कम रूपये-२९४४७५/- (अक्षरी रुपये दोन लाख चौऱ्यानव हजार चारशे पंच्याहत्तर फक्त) ची त्वरीत वसुली करण्यात यावी.

**प्रदिप बा. जगताप,**
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
चंद्रपूर.

चंद्रपूरः
दिनांक १३ मे, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.